# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक- २४४

**(सभावृत्तांत)**

**दिनांक- १३/१०/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **१३/१०/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२०व दिनांक २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) तसेच मा. कक्ष अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक-आव्यप्र-२०२०/प्र.क्र.२२५/आव्यप्र-१ दिनांक १७/९/२०२१ अन्वये सभागृहातील आसन क्षमतेच्या ५०% प्रमाणे सदस्यांचे उपस्थितीत आयोजित करणेत आलेली आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे - सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९. मा.सुजाता सुनिल पालांडे
१०. मा.भोईर सुरेश शिवाजी
११. मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.भालेकर प्रविण महादेव
१४. मा.बनसोडे राजू विश्वनाथ

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.ढाकणे- अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.भोसले मुख्यलेखा परिक्षक, मा.राजन पाटिल- शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.नाळे- उपसंचालक नगररचना, मा.इंगळे, मा.झगडे, मा.दुरगुडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.इंदलकर- उप आयुक्त, मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.भालकर, मा.इंगळे, मा.तांबे, मा.कुलकर्णी- सह शहर अभियंता, मा.बहुरे, मा.जोशी, मा.देशमुख,

मा.दांगट, मा.खांडेकर, मा.थोरात, मा.शिंदे, मा.गायकवाड- सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वाय.सी.एम.एच., मा.देसले, मा.काळे, मा.वाघुंडे, मा.टकले, मा.महाजन, मा.देशमुख, मा.धुमाळ, मा.खबाडे, मा.मोरे, मा.नरोन्हा- कार्यकारी अभियंता, मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.पानसरे- क्रीडा अधिकारी, मा.गोफणे- सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.पानसरे- प्रभाग अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी, मा.पाटील- प्राचार्य (आय.टी.आय.मोरवाडी) हे अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

विषय क्र.३१) तरतुद वर्ग करणेबाबत.- मा.पौर्णिमा सोनवणे व मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३२) आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील क्षेत्रिय कार्यालय निहाय कचरा संकलन अलगीकरण करणेबाबत.

विषय क्र.३३) सन २०२०-२१ या वर्षातील संचलन तूट रक्कम अग्रिम अदा करणेबाबत.

विषय क्र.३४) कामगार कल्याण विभागाकडील “स्थायी आस्थापना” व “बोनस तथा सानुग्रह अनुदान” या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेबाबत.

विषय क्र.३५) ठराव क्र.१०४२८ दिनांक ०६/१०/२०२१ चे दुरुस्ती करणेबाबत.- मा.फुगे भिमाबाई व मा.यादव मीनल यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) कोरोना विषयक जागृतीपर फ्लेक्स स्टँडी तयार करणेकामी झालेल्या र.रु.२,९८,३०४/- च्या खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेबाबत.- मा.फुगे भिमाबाई व मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३७) इंदिरा गांधी उड्डाण पुलाखाली गाळे भाडेतत्वावर देणेबाबत.- मा.फुगे भिमाबाई व मा.भोईर सुरेश यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३८) मनपा वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेबाबत.- मा.फुगे भिमाबाई व मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) पुणे महानगर परिवहन महामंडळातील अधिकारी/ कर्मचारी यांना बोनस व सानुग्रह अनुदान देणेबाबत.- मा.कदम शशिकांत व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४०) अंदाजपत्रकीय तरतुदीत वर्गीकरण करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४१) क क्षेत्रिय कार्यालयाकडील विकास कामांसाठी वाढ/ घट करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) भाववाढ फरक बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.- मा.कदम शशिकांत व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या कामांच्या तरतुदींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करुन वाढ करणेबाबत.- मा.भालेकर प्रविण व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदींमध्ये वाढ/ घट वर्गीकरण करणेबाबत.- मा.भालेकर प्रविण व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या विकास कामांच्या तरतुदींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करुन वाढ करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४६) पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या विकास कामांच्या तरतुदींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करुन वाढ करणेबाबत.- मा.भोईर सुरेश व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

-------------

ठराव क्रमांक- १०४३७ विषय क्रमांक- ०१
दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- जलनि:सारण
सुचक- मा.कदम शशिकांत अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/८४२/२०२१, दि.२०/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.15/99/2020-21 अन्वये चिंचवड मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.१५ मधील से.क्र.२५ ते २६ व इतर परिसरात जलनि:सारण विषयक सुधारणा कामे करणे व उर्वरित ठिकाणी जलनिःसारण नलिका टाकणेकामी मे.विराज प्रविण नाणेकर नि.र.रू.44,98,157/- (अक्षरी र.रु.चौवेचाळीस लाख अठ्यान्नव हजार एकशे सत्तावन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,98,157/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,98,157/- पेक्षा 12.99% कमी म्हणजेच र.रु.39,13,846/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.10,845/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.39,24,691/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व

निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४३८ — विषय क्रमांक- ०२

दिनांक- १३/१०/२०२१ — विभाग- विद्युत

सुचक- मा.कदम शशिकांत — अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.विमुका/०४/कावि/९४३/२०२१, दि.२७/०९/२०२१.

विषय- अ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१५ मधील नाट्यगृह मध्ये साऊंड सिस्टीम तसेच स्टेजवरील लाईट व अनुषंगिक कामे करणे.

विषय क्र.०२ चा विचार पुढील सभेचेवेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४३९ — विषय क्रमांक- ०३

दिनांक- १३/१०/२०२१ — विभाग- स्थापत्य ह

सुचक- मा.कदम शशिकांत — अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/९७५/२०२१, दि.३०/०९/२०२१.

विषय- प्रभाग क्र.०८ येथील MIDC पोलिस स्टेशन इमारतीचे विस्तारीकरण करणे.

विषय क्र.०३ चा विचार पुढील सभेचेवेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४० — विषय क्रमांक- ०४

दिनांक- १३/१०/२०२१ — विभाग- विद्युत

सुचक- मा.कदम शशिकांत — अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/०५/कावि/६७३/२०२१, दि.२८/०९/२०२१.

विषय- प्रक्र.३ च-होली येथील आरक्षण क्र.२/८१ खेळाचे मैदान विकसीत करणे व विद्युत विषयक कामे करणे. (टप्पा २)

विषय क्र.०४ चा विचार पुढील सभेचेवेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४१ | विषय क्रमांक- ०५

दिनांक- १३/१०/२०२१ | विभाग- जलनि:सारण फ क्षेत्रिय

सुचक- मा.कदम शशिकांत | अनुमोदक- मा.कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.फक्षेका/जनि/कावि/८५४/२०२१, दि.३०/०९/२०२१.

विषय- पिंपरी चिंचवड महागरपालिका फ क्षेत्रिय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पद्धीतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने) या कामास मुदतवाढ (तृतीय वर्ष सन २०२१-२२ पर्यंत) मिळणेबाबत.

विषय क्र.०५ चा विचार पुढील सभेचेवेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४२ | विषय क्रमांक- ०६

दिनांक- १३/१०/२०२१ | विभाग- स्थापत्य

सुचक- मा.संतोष कांबळे | अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/१/कावि/४९५/२०२१, दि.०२/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे

शहरामध्ये उद्यान व्यवस्थापन व रस्त्यांचे विकास करणेसाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती घेणेकामी दिनांक-२८/०७/२०२१ व ३०/०७/२०२१ या कालावधीमध्ये खालील अधिकारी उपस्थित राहणेकामी मान्यता दिलेली आहे. तसेच इंदौर येथील वास्तव्य विमान प्रवास खर्चाला मान्यता दिलेली आहे.

1. श्री. श्रीकांत सवणे, सह शहर अभियंता (BRTS),
2. श्री.सुभाष इंगळे, उप आयुक्त (उद्यान)
3. श्री. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता (BRTS),
4. श्री. विलास देसले, कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
5. श्री. देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता(स्थापत्य)
6. श्री. गोरख गोसावी, सहा उद्यान अधिक्षक
7. श्री.अनुप फणसे, CTO प्रतिनिधी

मा. आयुक्त सो. यांचे तोंडी सुचनेनुसार श्री.सतीश इंगळे सह शहर अभियंता यांना सदरचे दौ-यास परवानगी देण्यात आली असे. सदर दौ-याकामी एकूण ८ अधिकारी उपस्थित होते. इंदौर येथे वरील ८ अधिकारी उपस्थित राहिले आहेत. वरील नमुद अधिका-यांना इंदौर दौ-यासाठी आलेला खर्च र.रू.१,८७,५७७/- (अक्षरी र.रू.एक लाख सत्याऐंशी हजार पाचशे सत्याहत्तर फक्त) या रक्कमेला कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४३ विषय क्रमांक- ०७

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- आरोग्य

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/१६९/२०२१, दि.०४/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या १०५ प्राथमिक शाळा, माध्यमिक विभागाचे १८ माध्यमिक विद्यालय व मनपाचे २ औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) येथे मनुष्यबळाद्वारे वर्ग खोल्या साफसफाई करणेकामी १८६ कामगार, यांत्रिकी पध्दतीने शौचालय व मुता-या साफसफाई करणे कामासाठी ४६ कामगार व क्षेत्रीय कार्यालयानुसार 9 सुपरवायजर पुरविणे या कामासाठी २ वर्षे कालावधीकरिता आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत निविदा नोटीस क्र.०८/२०१८-१९ प्रसिध्द करुन मे.ब्रिस्क इंडिया प्रा.लि. यांचे लघुत्तम दर **(L-1)** सादर केलेला निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ०.०८% ने जास्त दर स्वीकृत करुन कामकाज आदेश देणेत आलेला आहे. सदर निविदेची मुदत दि.15/०9/२०२१ रोजी संपुष्ठात आलेली असुन, नविन निविदेची कार्यवाही सुरु आहे. या कामकाजाकरीता अंदाजे 2महिने कालावधी लागणार असलेने, तोपर्यंत मुदतवाढ देवून याकामी येणा-या र.रु.1,43,20,995/-(अक्षरी र.रु.एक कोटी त्रेचाळीस लाख वीस हजार नउशे पंच्यान्नव फक्त) इतके अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास 2 महिने कालावधीकरीता तथा निविदा प्रक्रिया पुर्ण होवून प्रत्यक्ष कामकाज सुरू होईल यापैकी जे प्रथम होईल तसेच महाराष्ट्र शासनामार्फत किमान वेतन कायद्यानुसार वेळोवेळी होणा-या वेतनातील बदलानुसार वेतन अदा करणेस व प्रत्यक्ष येणा-या खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) नुसार मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील मे.ब्रिक्स इंडिया प्रा.लि. यांचे सदर कामाकरीता दोन महिने कालावधीसाठी मुदतवाढ व र.रु.१,४३,२०,९९५/- (अक्षरी र.रु.एक कोटी त्रेचाळीस लाख वीस हजार नऊशे पंच्याण्णव फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४४ विषय क्रमांक- ०८

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३१४/२०२१, दि.०४/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औ.प्र. केद्र मोरवाडी यांचे साठी आवश्यक टुल्स, इक्विपमेंट व मशिनरी साहित्य पुरवठा करुन टर्न की प्रोजेक्ट कार्यान्वीत करुन देणेकामी

ईनिविदा सुचना क्र.४६/२०२०-२१ नुसार मे.इंद्रनिल टेक्नॉलॉजी, पुणे २७ यांचे प्राप्त दर र.रु.५,५२,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच कोटी बावन्न लाख फक्त) हे अंदाजपत्रकिय निविदा दर र.रु.६,४२,७७,२७२/- पेक्षा १४.१२% कमी व लघुत्तम प्राप्त झालेले असुन सदरचे दर स्विकृत करणेत आलेले आहेत. त्यानुसार मे.इंद्रनिल टेक्नॉलॉजिज, नवी सांगवी, पुणे २७ यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस व सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४५ विषय क्रमांक- ०९

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- स्थापत्य ब क्षेत्रिय

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बक्षे/स्था/५कावि/१४१/२०२१, दि.०४/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र.१७ मधील महसुली मुख्यालय/प्रभाग या लेखाशिर्षाखालील चालू कामांची सन्मा.नगरसदस्य यांची मागणी व आवश्यकता लक्षात घेता सदर कामास वाढ/घट व्दारे अखर्चित तरतुदीतुन आवश्यक तरतूद उपलब्ध करून घ्यावी लागणार आहे. त्या करीता खालील तक्त्यामध्ये नमुद कामाच्या तरतुदी मध्ये वाढ/घट करून मिळणे आवश्यक आहे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | लेखाशीर्ष | पा. क्र. | अनु. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२०-२१ ची तरतूद | वाढ | घट | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१७ मध्ये चिंचवडेनगर भागातील डांबरी रस्त्याची दुरूस्ती हॉटमिक्स पद्धतीने करणे. | महसुली मुख्यालय - डांबरी रस्ते दुरूस्ती | ५७९ | १६ | ३५००००० | ० | १८५०००० | ० | १८५०००० |
| २ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मध्ये वाल्हेकरवाडी भागातील पावसाळी गटर्स, नाला व फुटपाथ यांची स्थापत्य विषयक दुरूस्ती करणे. | महसुली मुख्यालय - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८३ | ४४ | ३०००००० | ८००००० | १०००००० | ० | १८००००० |
| ३ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील वाल्हेकरवाडी भागातील पाथवेची दुरूस्ती करणे. | महसुली प्रभाग - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८९ | ६६ | १०००००० | १००००० | ४७५००० | ० | ५७५००० |
| ४ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील वाल्हेकरवाडी भागातील स्थापत्य विषयक दुरूस्तीची कामे करणे. | महसुली प्रभाग - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८९ | ६८ | १०००००० | १००००० | ४७५००० | ० | ५७५००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील बिजलीनगर व शिवनगरी भागातील पाथवेची दुरूस्तीकरणे. | महसुली प्रभाग - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८९ | ६९ | १००००० | १०००० | ४७५००० | ० | ५७५००० |
| ६ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील चिंचवडेनगर भागातील पाथवेची दुरूस्ती करणे. | महसुली प्रभाग - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८९ | ७४ | १००००० | १४००० | ५६१००० | ० | ५७५००० |
| ७ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील मंडप व्यवस्थेची कामे करणे. | महसुली प्रभाग - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८९ | ७७ | १००००० | ० | ६५५००० | ० | ६५५००० |
| ८ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मध्ये प्रेमलोक पार्क व दळवीनगर व इतर परिसरातील रस्त्यांची दुरूस्ती एमपीएम पद्धतीने करणे. | महसुली प्रभाग - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८२ | १३ | १००००० | ५५०००० | १६०००० | ० | ७१०००० |
| ९ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मध्ये बिजलीनगर व शिवनगरी परिसरातील रस्त्यांची दुरूस्तीएमपीएम पद्धतीने करणे. | महसुली प्रभाग - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८२ | १२ | १००००० | ५५०००० | १६०००० | ० | ७१०००० |
| १० | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील प्रेमलोक पार्क व दळवीनगर भागातील स्थापत्य विषयक दुरूस्तीची कामे करणे. | महसुली प्रभाग - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८९ | ७३ | १००००० | ५५०००० | ७५००० | ० | ६२५००० |
| ११ | सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील मनपा इमारतींची देखभाल दुरूस्ती कामे करणे. | महसुली प्रभाग - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८३ | ४७ | २५००००० | ३००००० | ६३५००० | ० | ९३५००० |
| ११ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मध्ये बिजलीनगर व शिवनगरी भागातील डांबरी रस्त्याची दुरूस्तीहॉटमिक्स पद्धतीने करणे. | महसुली मुख्यालय - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५७९ | १५ | ३५००००० | ५००००० | ५००००० | ० | १०००००० |
| १२ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मध्ये वाल्हेकरवाडी भागातील डांबरी रस्त्याची दुरूस्तीहॉटमिक्स पद्धतीने करणे. | महसुली मुख्यालय - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५७९ | १४ | ३५००००० | ३५०००० | १५००००० | ० | १८५०००० |
| १३ | सन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मध्ये प्रेमलोक पार्क व दळवीनगर भागातील डांबरी रस्त्याची दुरूस्तीहॉटमिक्स पद्धतीने करणे. | महसुली मुख्यालय - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५७९ | १७ | ३५००००० | ० | १२००००० | ० | १२००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | (सन २०२१-२२ साठी) वाल्हेकरवाडी व चिंचवडेनगर भागात आवश्यकतेनुसार पावसाळी पाण्याच्या वाहिन्या टाकणे. | महसुली मुख्यालय - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८५ | ८० | ७०००००० | ५०००००० | ० | ३७२१००० | १२७९००० |
| १५ | (सन २०२१-२२ साठी) प्रेमलोक पार्क शिवनगरी व दळवीनगर भागात आवश्यकतेनुसार पावसाळी पाण्याच्या वाहिन्या टाकणे. | महसुली मुख्यालय - किरकोळ देखभाल दुरूस्ती | ५८५ | ८१ | ८०००००० | ६०००००० | ० | ६०००००० | ० |
| एकूण | | | | | ४२५००००० | १४९१४००० | ९७२१००० | ९७२१००० | १४९१४००० |

उपरोक्त कामे करणेची मा.सन्मा.नगरसदस्य यांची मागणी लक्षात घेता मनपाचे सन २०२१-२२ च्या मुळ अंजपत्रकामधील तरतुदी मध्ये वरीलप्रमाणे वाढ/घट करणे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.९७,२१,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४६ | विषय क्रमांक- १०

दिनांक- १३/१०/२०२१ | विभाग- झोनिपु स्थापत्य

सुचक- मा.संतोष कांबळे | अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/१०/१३२/२०२१, दि.३०/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.2/65/2021-22 अन्वये प्रभाग क्र.२६ मधील आण्णाभाऊ साठेनगर झोपडपट्यामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे व देखभाल दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२१-२२) कामी मे.केसीआर कन्स्ट्रक्शन नि.र.रू.25,49,950/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख एकोणपंन्नास हजार नऊशे पंन्नास फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.24,88,400/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.24,88,400/- पेक्षा 31.99% कमी म्हणजेच र.रु.16,92,361/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.34,650/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.61,550/- = एकुण र.रु.17,88,561/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४७ विषय क्रमांक- ११

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- झोनिपु स्थापत्य

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/१०/१३३/२०२१, दि.३०/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.2/71/2021-22 अन्वये ब','ड' व 'ग' प्रभाग झोपडपट्यामधील सार्वजनिक शौचालयांना स्वच्छ भारत अभियानांअतंर्गत रंगरंगोटी व स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणेकामी मे.केसीआर कन्स्ट्रक्शन नि.र.रू.25,49,419/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख एकोणपंन्नास हजार चारशे एकोणवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.24,87,869/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.24,87,869/- पेक्षा 32.05% कमी म्हणजेच र.रु.16,90,507/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.34,279/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.61,550/- = एकुण र.रु.17,86,336/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४८ विषय क्रमांक- १२

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- क क्षेत्रिय

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/आ१५/कावि/५२१/२०२१, दि.०४/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रिय कार्यालय आरोग्य विभागाच्या सन 2021-22 चे मुळ अंदाजपत्रकामध्ये वाहन इंधन या लेखाशिर्षकामध्ये र.रु.8,80,000/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. सदरच्या तरतुदी मधुन कचरा वाहतुक व किटकनाशक विभागातील डिझेल बिले माहे एकुण र.रु.1,60,000/- इतका खर्च येत आहे. दिनांक 15/06/2021 अखेर एकुण र.रु.७,०५,२४८/- खर्च झालेला आहे व र.रु.1,74,752/- इतकी तरतूद शिल्लक आहे. दि.16/06/2021 पासून मे ॲफेक्सो पेट्रोल पंप प्रा. लि. यांना बिले अदा करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर लेखाशिर्षावर तरतुद कमी पडणार आहे. सन 2021-22 चे अदांजपत्रकामध्ये मनपा इमारतीमधील पाण्याच्या टाक्या साफसफाई करणे या लेखाशिर्षावर र.रू.11,00,000/- इतकी तरतुद असुन त्यामधुन आजअखेर र.रू.0/- इतकी रक्कम खर्ची टाकणेत आलेली आहे. व

र.रू.11,00,000/- इतकी रक्क्म शिल्ल्क आहे. सदर मनपा इमारतीमधील पाण्याच्या टाक्या साफसफाई करणे या लेखाशिर्षाकावरील रक्कमेतुन र.रु.5,00,000/- (अक्षरी र.रु.पाच लाख फक्त) इतकी रक्क्म वाहन इंधनया लेखाशिर्षावर वर्ग करणेस खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४४९ विषय क्रमांक- १३

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- क क्षेत्रिय

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/आ१५/कावि/५२२/२०२१, दि.०४/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रिय कार्यालय आरोग्य विभागाच्या सन 2021-22 चे मुळ अंदाजपत्रकामध्ये 'धुरीकरण इंधन खर्च' या लेखाशिर्षकामध्ये र.रु.१,९८,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. सदरच्या तरतुदी मधुन किटकनाशक विभागातील धुरीकरण इंधन खर्च या लेखाशिर्षमधून आजपर्यंत र.रु.१,९७,९९७/- इतका खर्च झालेला असून र.रु.४३/- इतकी तरतूद शिल्लक आहे. दिनांक १६/०९/२०२१ पासून धुरीकरण इंधन खर्चाची प्राप्त होणारी बिले मे.ऍफेक्सो पेट्रोल पंप प्रा. लि. यांना अदा करणेसाठी सदरची रक्कम पुरेशी नसल्यामुळे सदरचे लेखाशिर्षावर तरतुद कमी पडणार आहे. सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकामध्ये मनपा इमारतीमधील पाण्याच्या टाक्या साफसफाई करणे या लेखाशिर्षावर र.रू.११,००,०००/- इतकी तरतुद असून त्यामधुन आजअखेर र.रू.0/- इतकी तरतुद खर्ची टाकणेत आलेली असून र.रू.११,००,०००/- इतकी तरतुद शिल्लक आहे. सदर मनपा इमारतीमधील पाण्याच्या टाक्या साफसफाई करणे या लेखाशिर्षकावरील रक्कमेतुन र.रू.४,००,०००/- इतकी रक्कम 'धुरीकरण इंधन खर्च' या लेखाशिर्षाकवर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४५० विषय क्रमांक- १४

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- विद्युत

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.सह शहर अभियंता(वि) यांचे पत्र क्र.विमुका/०४/कावि/९५८/२०२१, दि.०५/१०/२०२१.

मा.सह शहर अभियंता(वि) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.14-02/2021-2022 अन्वये पिंपरी प्रभाग क्र.21 मधील आरक्षण क्र.162 येथे खेळाचे मैदानाकरीता विद्युतविषयक कामे करणे, निविदा र.रु.45,65,924/- + GST (अक्षरी रक्कम रुपये पंचेचाळीस लाख पासष्ट हजार नऊशे चोवीस फक्त+ GST) पेक्षा - 24.00% कमी या निविदा मंजूर दराने लघुत्तम दराचे ठेकेदार मे.राजसन इलेक्ट्रॉन्स

यांचेकडून काम करुन घेणेस निविदा अटीनुसार भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४५१ विषय क्रमांक- १५

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- बी.आर.टी.एस. स्थापत्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बी.आर.टी.एस./१२५४/२०२१, दि.०५/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

रावेत स.नं.१५१ इस्कॉन मंदीर ते भोंडवे कॉर्नर पर्यंतचा ३४.५० मी. रूंद सेवा रस्ता विकसित करणेचे नियोजन आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखा शिर्षाअंतर्गत सदर कामाचा समावेश असुन प्रशासकीय मान्यता व तरतुद करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी रावेत स.नं.१५१ इस्कॉन मंदीर ते भोंडवे कॉर्नर पर्यंतचा ३४.५० मी. रूंद सेवा रस्ता विकसित करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेसाठी मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दर मागविणेत आले होते. त्यानुसार प्राप्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**तुलनात्मक दर पत्रक (Compretive Stetamant)**

| अ.क्र. | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि. | १.४०% | L1 |
| २ | मे. विकास इंडीया | १.४५% | L2 |
| ३ | मे.प्लानीटेक कन्स्लटन्सी | १.५०% | L3 |
| ४ | मे.अश्युअर्ड इंजि.सर्व्हिसेस | १.७४% | L4 |
| ५ | मे.नेक्सस टेकनो कन्स्लटंट्स | १.९५% | L5 |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार मे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि. यांचा १.४०% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर रस्त्याचे नियोजन करुन आराखडे तयार करणे, सुशोभिकरणाचे बाबींचे दरपृथ्थकरण करणे व त्यानुसार पुर्वगणक पत्रक करणे व निविदा बनविणे इ. (Pretender) व निविदापश्चात (Post Tender) इ. कामे करावी लागणार आहेत. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागा यांचेकडील शासन निर्णयनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्यांच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सुचनांनुसार शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नावि/-१६ अन्वये टप्पे विहित करणेत आले आहेत. याप्रमाणे सदर कामासाठी सल्लागारास प्रकल्प व्यवस्थापनासाठी खालील प्रमाणे टप्पे विहित करुन,फी अदा करणेत येईल.

| अ. क्र. | प्रकल्पाच्या /कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) | | |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पासाठी | इतर सर्व कामांसाठी | प्राप्त कोटेशन नुसार देय रक्कम |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०७५% (डीपीआर ०.५०% + प्र.मा.-०.२५%) | ०.५० (डीपीआर०.३३% + प्र.मा.-०.१७%) | ०.३० (डीपीआर०.२५% + प्र.मा.-०.०५%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.२५% | ०.१६ | ०.१० |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ | ०.२० |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ | ०.२० |
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० | ०.३० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० | ०.३० |
| **एकुण** | | ३.००% | २.००% | १.४०% |

मे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि.यांनी सादर केलेले दर हे शासनाने ठरवुन दिलेल्या दरा पेक्षा कमी आहेमे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि.यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणुक करणेस व महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नावि/-१६ अन्वये निविदा स्विकृत रक्कमेच्या १.४०% फी मे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि.यांना निविदापुर्व (Pretender) व निविदापश्चात (Post Tender)अदा करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४५२ विषय क्रमांक- १६

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- बी.आर.टी.एस. स्थापत्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बी.आर.टी.एस./१२५५/२०२१, दि.०५/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

रावेत येथील भोंडवे बाग ते सेलेस्टेल सीटी ते बीआरटी रस्त्यापर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार विकसित करणेचे नियोजन आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखा शिर्षाअंतर्गत सदर कामाचा समावेश असुन

प्रशासकीय मान्यता व तरतुद करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी रावेत येथील भोंडवे बाग ते सेलेस्टेल सीटी ते बीआरटी रस्त्यापर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार विकसित करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेसाठी मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दर मागविणेत आले होते.त्यानुसार प्राप्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**तुलनात्मक दर पत्रक (Compretive Stetamant)**

| अ.क्र. | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि. | १.४०% | L1 |
| २ | मे. विकास इंडीया | १.४५% | L2 |
| ३ | प्लानीटेक कन्स्लटन्सी | १.४६ | L3 |
| ४ | मे.अश्युअर्ड इंजि.सर्व्हिसेस | १.७४% | L4 |
| ५ | मे.नेक्सस टेकनो कन्स्लटंट्स | १.९५% | L5 |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार मे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि.यांचा १.४०%इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर रस्त्याचे नियोजन करुन आराखडे तयार करणे, सुशोभिकरणाचे बाबींचे दरपृथ्थकरण करणे व त्यानुसार पुर्वगणक पत्रक करणे व निविदा बनविणे इ. (Pretender) व निविदापश्चात (Post Tender) इ. कामे करावी लागणार आहेत. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागा यांचेकडील शासन निर्णयनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्यांच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सुचनांनुसार शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नावि/-१६ अन्वये टप्पे विहित करणेत आले आहेत. याप्रमाणे सदर कामासाठी सल्लागारास प्रकल्प व्यवस्थापनासाठी खालील प्रमाणे टप्पे विहित करुन,फी अदा करणेत येईल.

| अ. क्र. | प्रकल्पाच्या /कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) | | |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पासाठी | इतर सर्व कामांसाठी | प्राप्त कोटेशन नुसार देय रक्कम |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०७५%(डीपीआर ०.५०%+ प्र.मा.- ०.२५%) | ०.५० (डीपीआर०.३३% +प्रमा-०.१७%) | ०.३० (डीपीआर०.२५% + प्रमा-०.५%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.२५% | ०.१६ | ०.१० |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण | ०.४०% | ०.२७ | ०.२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | झाल्यानंतर | | | |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ | ०.२० |
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० | ०.३० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० | ०.३० |
| **एकुण** | | ३.००% | २.००% | १.४०% |

मे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि.यांनी सादर केलेले दर हे शासनाने ठरवुन दिलेल्या दरा पेक्षा कमी आहे मे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणुक करणेस व महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नावि/-१६ अन्वये निविदा स्विकृत रक्कमेच्या १.४०% फी मे.पेव्हटेक कन्सलटींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि. यांना निविदापुर्व (Pretender) व निविदापश्चात (Post Tender)अदा करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४५३ विषय क्रमांक- १७

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- बी.आर.टी.एस. स्थापत्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बी.आर.टी.एस./१२५६/२०२१, दि.०५/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

रावेत डी. वाय. पाटील कॉलेज रस्त्यावरील रॉयलशेल ते बालाजी हॉटेल ते नाल्यापर्यंत सेक्टर ३२ परीसरातील रस्ते अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार विकसित करणेसाठी नियोजन आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखा शिर्षाअंतर्गत सदर कामाचा समावेश असुन प्रशासकीय मान्यता व तरतुद करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी रावेत डी. वाय. पाटील कॉलेज रस्त्यावरील रॉयलशेल ते बालाजी हॉटेल ते नाल्यापर्यंत सेक्टर ३२ परीसरातील रस्ते अर्बन स्ट्रीट डीझाईननुसार विकसित करणेसाठीप्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेसाठी मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दर मागविणेत आले होते. त्यानुसार प्राप्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**तुलनात्मक दर पत्रक (Compretive Stetamant)**

| अ.क्र. | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नाव | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.नेक्सस टेक्नो कन्सल्टंट | १.३७% | L1 |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मे.पेव्हटेक कन्सल्टींग इंजीनियरींग सर्व्हीसेस प्रा.लि. | १.३८% | L2 |
| ३ | मे.प्लानीटेक कन्स्लटन्सी | १.४०% | L3 |
| ४ | मे. विकास इंडीया | १.४५% | L4 |
| ५ | मे.अश्युअर्ड इंजि.सर्व्हिसेस | १.७४% | L5 |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार मे.नेक्सस टेक्नो कन्सल्टंट यांचा १.३७%इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर रस्त्याचे नियोजन करुन आराखडे तयार करणे, सुशोभिकरणाचे बाबींचे दरपृथ्थकरण करणे व त्यानुसार पुर्वगणक पत्रक करणे व निविदा बनविणे इ. निविदा पूर्व (Pretender) व निविदापश्चात (Post Tender) इ. कामे करावी लागणार आहेत. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागा यांचेकडील शासन निर्णयनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्यांच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सुचनांनुसार शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नावि/-१६ अन्वये टप्पे विहित करणेत आले आहेत. याप्रमाणे सदर कामासाठी सल्लागारास प्रकल्प व्यवस्थापनासाठी खालील प्रमाणे टप्पे विहित करुन,फी अदा करणेत येईल.

| अ. क्र. | प्रकल्पाच्या /कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) | | |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पासाठी | इतर सर्व कामांसाठी | प्राप्त कोटेशन नुसार देय रक्कम |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०७५%(डीपीआर ०.५०%+ प्र.मा.-०.२५%) | ०.५० (डीपीआर०.३३% +प्रमा-०.१७%) | ०.२७ (डीपीआर०.२२% +प्रमा-०.०५%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.२५% | ०.१६ | ०.१० |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ | ०.२० |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ | ०.२० |
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० | ०.३० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० | ०.३० |
| | **एकुण** | ३.००% | २.००% | १.३७% |

मे.नेक्सस टेक्नो कन्सल्टंटयांनी सादर केलेले दर हे शासनाने ठरवुन दिलेल्या दरापेक्षा कमी

मे.नेक्सस टेक्नो कन्सल्टंटयांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणुक करणेस व महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नावि/-१६ अन्वये निविदा स्विकृत रक्कमेच्या १.३७% फी मे.नेक्सस टेक्नो कन्सल्टंट यांना निविदापुर्व (Pretender) व निविदापश्चात (Post Tender)अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४५४ विषय क्रमांक- १८

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- पाणीपुरवठा

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/२३२/२०२१, दि.०५/१०/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे

"पवना धरणापासुन से.क्र.२३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणेसाठी थेट पाईप लाईन टाकणे"या कामाचा आदेश ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांना दि.३०/०४/२००८ रोजी देणेत आला आहे. दि.०९/०८/२०११ रोजी मुंबई-पुणे द्रतगती मार्गावर बऊर येथे या प्रकल्पा विरोधात झालेल्या रस्ता रोको आंदोलना प्रसंगी पोलीस गोळीबारात ३ शेतक-यांचा दुर्दैवी मृत्यु झाल्याने दि.१०/०८/२०११ पासुन मा. जिल्हादंडाधिकारी,पुणे यांचे आदेशानुसर जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था परिस्थिती आबाधीत ठेवणेसाठी सदरचे काम बंद ठेवणेत आले आहे. सद्यस्थितीत, सदरचे काम पुनश्च:चालु करणेकरीता राज्य शासनाकडे पाठपुरावा चालु आहे. दि.२५/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये ठेकेदाराने कामाचे Termination करणेबाबत नोटिस दिलेली आहे. मौजे रावेत, सर्व्हे नं.१७७ पै. येथे सरकारी गायरान असुन त्याचे क्षेत्रफळ अंदाजे ७ ते ८ हेक्टर एवढे आहे. परंतु सदरचे गायरान मनपाच्या ताब्यात नाही. कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग, 'अ'दापोडी,पुणे-१२ यांनी ८० लक्ष ( १८%G.S.T धरुन ) एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक कळविणेत आले होते. त्याअनुषंगाने सदरच्या खर्चास मा. स्थायी समिती ठराव क्र.५०७३, दि.२४/०७/२०१९ अन्वये मंजुर करणेत आला आहे. तदनंतर मा. स्थायी समिती ठराव क्र.५८३२, दि.०६/११/२०१९ अन्वये जलसंपदा विभागाकडून थेट पध्दतीने काम करणे पेक्षा निविदा काढुन केलेस कमी खर्चात काम होऊ शकेल असे सदर ठरावात नमुद केले आहे. तरी त्याबाबत झालेला ठराव क्रमांक.५०७३, दि.२४/०७/२०१९ रद्द करुन काम नव्याने निविदा मागवून करणेस मान्यता देणेत आली आहे. पुनश्च:मा कार्यकारी अभियंता द्वार निर्मिती विभाग 'अ'दापोडी,पुणे-१२ यांना मावळ भागातील लोखंडी पाईप स्थालांतरित या विभागास करावयाचे असल्याने सुधारित कोटेशन देणे बाबत कळविले आहे. तरी त्याअनुषंगाने त्यांना पत्र क्र.द्वा.नि.वि. 'अ'/तां-१/निधी/१९८७/सन २०२१,दि. २०/०८/२०२१ अन्वये र.रु.१३४.६७ लक्ष (१८ % G.S.T. धरुन) एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक कळविले आहे. कामातील लोखंडी पाईप्स सर्वसाधारण १२ मी. लांबीचे, १.८० मी.

व्यासाचे, ८/१० मि मी जाडीचे असे एकूण साधारणत:२१६९ एवढे नग आहेत. सदर पाईप्स ने-आण करणेसाठी लागणारे यंत्र सामुग्री मा.कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग, 'अ' दापोडी, पुणे-१२ यांचे कडे उपलब्ध आहे. तसेच सदर विभागाकडील कनिष्ट अभियंता आणि उपअभियंता यांचे सोबत मनपाकडील कनिष्ठ अभियंता आणि उपअभियंता यांची प्रत्यक्ष स्थळपाहणी झालेली आहे. त्यांचेकडील चर्चेनुसार त्यांना अशाप्रकारचा अनुभव आहे तसेच त्यांचे कडील यंत्र सामुग्री यांना काम मिळू शकेल असे त्याचे तोंडी म्हणणे चर्चे मध्ये आले आहे. या व्यतिरिक्त सदरची संस्था शासकीय असल्याने त्यांना थेट पध्दतीने सदर काम देणे हरकत वाटत नाही असे या विभागाचे मत आहे. तरी त्याअनुषंगाने "पवना धरणापासुन से.क्र.२३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणेसाठी थेट पाईप लाईन टाकणे"या कामातील मावळ तालुक्यातील कामशेत, कान्हे फाटा, बोहा-डेवस्ती वडगाव मावळ, ब्राम्हणवाडी, किवळे आणि गहुंजे इत्यादि भागात असलेले पाईप्स पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्थालांतरित करणेसाठी र.रु.१३४.६७ लक्ष चा निधी कार्यकारी अभियंता द्वार निर्मित विभाग 'अ' यांचे नावे जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४५५ विषय क्रमांक- १९
दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- उद्यान/ वृक्षसंवर्धन
सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- मा.उपआयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/६१२/२०२१, दि.०६/१०/२०२१.

मा.उपआयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे

मनपाचे उद्यान विभागासाठी हार फुले, तुरे पुष्पगुच्छ नारळ इत्यादी पुरविणेबाबतचे कामकाज निविदा नोटीस क्र.१९/१ २०१७-१८ अन्वये मे.लक्ष्मी फ्लॉवर्स अँन्ड डेकोरेशन यांना ११.४३% कमी दराने देणेत आलेले आहे सदर कामाची मुदत दि.३०/०९/२०२१ अखेर आहे. गणेशोत्सव काळामध्ये कोरोना कोवीड १९ च्या प्रादुर्भावामुळे गणपती विसर्जनासाठी शासनाने प्रतिबंध लावणेत आलेले होते त्यामुळे गणपती विसर्जन करणेकामी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयास १० विसर्जन रथ तयार करणेकामी व त्या दिवस १.५,३,५,७,९,व १० या दिवशी फुलांनी सजविणेकामी सुचना देणेत आलेल्या होत्या.त्यानुसार मे.लक्ष्मी फ्लॉवर्स अँन्ड डेकोरेशन यांनी ८ क्षेत्रीय कार्यालयात एकुण २४० छोट्या/मोठ्या गाड्या विसर्जन रथ एकुण ४०,४०० फुलांच्या माळांनी सजविणेत आलेले होते.उद्यान विभागाकडील निविदा नोटीस, क्र. मधील प्राप्त ११.४३% कमी या दरानुसार र.रू.४२,९३,८७४/- अतिरीक्त खर्च झालेला आहे. तो मे.लक्ष्मी फ्लॉवर्स अँन्ड डेकोरेशन यांना अदा करणे आवश्यक असल्यामुळे सदरच्या खर्चास व त्यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०४५६ विषय क्रमांक- २०

दिनांक- १३/१०/२०२१ विभाग- क क्षेत्रिय

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.कक्षेका/वि/जा/५७६/२०२१, दि.०१/१०/२०२१.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका'क' क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रामधील प्रभाग क्र.६ मधील मधुबन कॉलनी चक्रपाणी वसाहत, लांडगे वस्ती चक्रपाणी रोड व एस. एन. जी. इंग्रजी माध्यम शाळा सद्गुरुनगर परिसरातील पथदिव्यांकरीता नव्याने वीजमीटर बसविणे आवश्यक आहे. त्याकरीता म.रा.वि.वि. कंपनीस अर्ज क्र.३३००९९०९ दि.०२/०८/२०२१, ३३०१२४५० दि.०२/०८/२०२१, ३४४०९०३० दि.२३/०९/२०२१ अन्वये कळविणेत आलेले आहे. त्यानुसार म.रा.वि.वि. कंपनी मार्फत लघुदाब वीजपुरवठा करणेकरीता फर्म कोटेशन प्राप्त झालेले आहे.म.रा.वि.वि. कंपनीमार्फत प्राप्त झालेल्या फर्म कोटेशनचा तपशील खालिलप्रमाणे.

| अ.क्र. | विजमीटरचे ठिकाण | ग्राहक क्रमांक | फर्म कोटेशन क्रमांक व दिनांक | निव्वळ देय रक्क्म |
|---|---|---|---|---|
